PARLE MAHOTSAV
Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

# पार्ले महोत्सवातील दुसरा दिवस ठरला खास महिलांचा

१८व्या पार्ले महोत्सवातील दुसरा दिवस महिलांचा खास दिवस ठरत कबड्डी, वॉलीबॉल, बॉक्स क्रिकेट, होम मिनिस्टर व मेहेंदी अशा महिला विभागाच्या स्पर्धा एकाच वेळी संपन्न झाल्या. महिलांच्या खास दिनी वेशभुषा, केशभुषा व मोठा उखाणा घेणे अशा अनोख्या स्पर्धाही घेण्यात आल्या. सर्व स्पर्धामधून सुमारे २,५०० महिला स्पर्धकांनी उत्साहाने भाग घेतला.

विशेष म्हणजे स्पर्धांसाठी क्रिकेट मध्ये अंपायर व कबड्डी, वॉलीबॉल मधील पंचान पासून स्कोर लिहणे इत्यादी कामांची जबाबदारी महिलांनीच पार पाडली. तर व्यासपीठावर सूत्रसंचालनापासून प्रमुख पाहूण्यांपर्यंत सर्वच महिला असल्याने पार्ले महोत्सवाची सर्व सूत्र महिलांकडे असल्याचे दिसत होते. पुरुष कार्यकत्यांच्या समवेत महिला कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असतोच पण प्रसंगी संपूर्ण महोत्सवही महिला आयोजित करु शकतात हा विश्वास सर्व महिलांमध्ये आला असे मत पार्ले महोत्सवाच्या सह-आयोजिका नगरसेविका ज्योती पराग अळवणी यांनी यावेळी व्यक्त केले.

या प्रसंगी उपस्थित भाजपा नेत्या शायना एन. सी. यांनी या महिला विशेष उपक्रमाचे कौतुक करीत स्पर्धक व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. तसेच बेटी बचाव - बेटी पढाव हा संदेश घेऊन पिंकेथॉनसाठी मुंबई ते पुणे १६४ कि.मी. धावणाऱ्या राखी रास्ते, दक्षा कनकिया, सुनिता मुंडे, अंजली प्रभू देसाई, संध्या ओक यांचा सन्मान शायना एन.सी. यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच पश्चिम रेल्वेतील महिला मोटरमन प्रिती कुमारी व स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या दिप्ती सावर्डेकर यांचाही सन्मान करण्यात आला.

पार्ले महोत्सवातील या महिला विशेष स्पर्धांची जबाबदारी सह-आयोजिका नगरसेविका ज्योती पराग अळवणी व सुनिता मेहता तसेच माजी नगरसेविका रिद्धि धुरी, ज्योत्स्ना जाधव, अरुणा भाट, वृंदा लाड, सरीता सागवेकर यांच्या सोबत इतर महिला कार्यकर्त्यांनी पार पाडली तर बक्षिस संमारंभाचे सूत्रसंचालन पूर्वा कर्वे यांनी केले.

---

सदर पत्रक पार्ले महोत्सव प्रसिद्धी प्रमुख दिपीका विश्वासराव पाटील यांनी प्रसिद्ध केले आहे.